| MHPA010027762020. | प्रकरण दाखल दिनांक - २५.११.२०२०. |
|---|---|
| | प्रकरण नोंदणी दिनांक - २५.११.२०२०. |
| | न्यायनिर्णय दिनांक - ३०.०७.२०२६. |
| | कालावधी - ०५ वर्षे ०८महिने ०५दिवस |

**भाग अ**

## अतिरिक्त सत्र न्यायालय, परभणी यांचे न्यायालय

( पिठासीन अधिकारी - गौतम ग. भरणे )

---

न्यायनिर्णय दिनांक : ३०.०७.२०२६.

सत्र खटला क्र. : १०६/२०२० निशाणी क्र. ७६.

---

प्रथम खबर क्र./गुन्हा नोंद क्र. : १२४/२०१६.

पोलीस ठाणे : पोलीस ठाणे नानलपेठ, परभणी, ता. व जि.परभणी.

---

अभियोगपक्ष : महाराष्ट्र शासन.

सरकारपक्षातर्फे : श्री. बी.बी.घटे, अति.सरकारी अभियोक्ता.

| | | |
|---|---|---|
| **आरोपी** | १ | गेंदमल भिकुलाल बांठीया,<br>वय ७७ वर्षे, धंदा व्यापार, |
| | २ | सुरेंद्र गेंदमल बांठीया,<br>वय ४७ वर्षे, धंदा व्यापार, |
| | ३ | विनय गेंदमल बांठीया,<br>वय ४३ वर्षे, धंदा व्यापार, |
| | ४ | संतोष शिवप्रसाद साखी,<br>वय ४९ वर्षे, धंदा खाजगी नोकरी,<br>सर्व रा. बाबु गेनु रोड कच्छी बाजार, परभणी. |

**आरोपींतर्फे** - श्री. एम.के. तोष्णीवाल वकील

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २७.०३.२०१६ |
| पहिली खबर तारीख | २७.०३.२०१६. |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २५.११.२०२०. |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | ०५.०५.२०२५. |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२.०९.२०२५. |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | २७.०७.२०२६. |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३०.०७.२०२६. |
| शिक्षेची तारीख, लागू असल्यास | लागू नाही. |

## आरोपीचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं. कलम ४२८ च्या उद्येशाने आरोपीने खटल्या दरम्यान कारागृहात घालवलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गेंदमल भिकुलाल बांठीया, | २१.०४.२०१६ | २१.०४.२०१६ | भा.दं.वि. कलम ३३२, ३४१, ३४२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम ३४. | निर्दोष | नाही. | नाही. |
| २ | सुरेंद्र गेंदमल बांठीया, | २१.०४.२०१६ | २१.०४.२०१६ | भा.दं.वि. कलम ३३२, ३४१, ३४२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम ३४. | निर्दोष | नाही. | नाही. |
| ३ | विनय गेंदमल बांठीया, | २१.०४.२०१६ | २१.०४.२०१६ | भा.दं.वि. कलम ३३२, ३४१, ३४२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम ३४. | निर्दोष | नाही. | नाही. |
| ४ | संतोष शिवप्रसाद साखी, | २१.०४.२०१६ | २१.०४.२०१६ | भा.दं.वि. कलम ३३२, ३४१, ३४२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम ३४. | निर्दोष | नाही. | नाही. |

## भाग क

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र.१ | संतोष प्रभाकरराव गायकवाड | घटनास्थळ पंच |
| स.सा.क्र.२ | दिपक केशवराव खंदारे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| स.सा.क्र.३ | उपेंद्र विश्वनाथ धकाते | फिर्यादी. |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास :

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन कागदपत्रांची यादी

### अ. अभियोग पक्ष -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र.पी-६५/सा.क्र.३ | फिर्याद |
| २ | नि.क्र.पी-७० | घटनास्थळ पचंनामा. |

### ब. बचाव पक्ष -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | | निरंक. |

### क. न्यायालयाने निशाणी क्रमांक दिलेले कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

## ड. भौतीक वस्तु -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरुप |
|---|---|---|
| | | निरंक |

## न्यायनिर्णय
## { दिनांक ३० जुलै २०२६ रोजी अधिघोषीत }

प्रस्तुत प्रकरण आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३३२, ३४१, ३४२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम ३४ या अपराधाकरीता चालवण्यात आले.

०२. सरकारपक्षाचे थोडक्यात कथन असे की, दिनांक २७.०३.२०१६ रोजी फिर्यादी उपेंद्र विश्वनाथराव धकाते यांनी पोलीस ठाणे, नानलपेठ, परभणी येथे तोंडी फिर्याद दिली की, ते महावितरण कार्यालय, परभणी येथे अतिरिक्त कार्यकारी अभियंता म्हणून जून २०१५ पासून काम पाहतात. दिनांक २७.०३.२०१६ रोजी त्यांचे वरिष्ठ कार्यालयाचे आदेशाप्रमाणे मार्च अखेरपर्यंत ज्या थकबाकीदारांनी विद्युत बिले भरली नाहीत त्यांचे विजबील वसूल करण्याकरीता दुपारी ०१.३० वाजताच्या सुमारास ते व त्यांचेसोबतचे सहकारी कर्मचारी अब्दूल रज्जाक, पवन भडंगे, राघवेंद्र शिरलेकर, अनीकेश मातने, दिनेश हनवते, देवीदास पवार, राजेश सटवाजी घोरपडे, मारोतराव शेळके, आरती वंजारे, सुरेखा वाघमारे, राजाबाई कांबळे, योगेश्वरी काळे असे सर्व परभणी येथील आंध्रा बँकेचे समोर रेमंड शोरुमचे डावे बाजुला आले. तेथे असलेल्या एका मुलाला त्यांनी विद्युत बील भरले का असे विचारले असता त्याने नाही असे सांगितले व संबंधीत ग्राहकाला फोन लावून बोलावून घेतले. सदर इसम तेथे आल्यावर त्यांनी त्याचे नाव विचारले असता त्यांनी आपले नाव गेंदमल बांटीया असे सांगितले. त्याला विज बीलाचा भरणा करण्यास सांगितले असता त्याने सांगितले की, मी वीज बील भरत नाही. त्यावेळी त्याचे नातेवाईक सुरेंद्र बांटिया, विनय बांटिया, संतोष व इतर सात ते आठ नातेवाईक तेथे आले व ते म्हणाले की, तुम्हाला काय करायचे ते करा. त्यानंतर फिर्यादीसोबत असलेल्या स्टाफने त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत केला असता ते सर्वजण रागात येऊन म्हणाले की, 'तुम्ही माझा विद्युत पुरवठा जोडून द्या त्याशिवाय मी तुम्हाला जाऊ देत नाही'. त्यानंतर फिर्यादी व त्यांचे वरीष्ठ सौदागर साहेब त्यांचे वाहन क्रमांक एम.एच.३०-पी.-९९४१ मध्ये जावुन बसले असता वरील आरोपींनी

त्यांना शिवीगाळ केली व घेराव घातला व 'तुम्हाला विद्युत पुरवठा जोडल्याशिवाय येथून जाऊ देत नाही' असे म्हणून शासकीय कामात अडथळा केला. संतोष मॅनेजरने फिर्यादीच्या गालात थापड मारली. गेंदमल बांठीया व सुरेंद्र बांठीया यांनी त्यांचे वरीष्ठ अब्दूल रज्ञाक सौदागर यांना धक्का-बुक्की करुन थापड-बुक्यांनी मारहाण केली व त्यांना दोघांना वाहनातून जबरदस्तीने खाली उतरविले व त्यांच्या दोन्ही हातांना पकडून त्यांचे घरात ढकलत नेले व एका खोलीमध्ये डांबून ठेवले. त्यानंतर सहा.अभियंता पवन भंडगे यांनी पोलीसांना माहिती दिल्यावरुन नानलपेठ पोलीस ठाणे येथील पोलीस कर्मचारी घटनास्थळी आले व त्यांची सोडवणून करुन त्यांना पोलीस ठाणे नानलपेठ येथे आणले.

०३. सदर फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द गुन्हा नोंदणी क्र.१२४/२०१६ भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, ३४१, ३४२, ३३२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम १४९ प्रमाणे नोंदवण्यात आला व तपास पो.उप.नि. श्री गिते यांच्याकडे देण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे बयान नोंदवले. अब्दूल रज्ञाक अब्दूल रहेमान सौदागर व उपेंद्र धकाते यांचे जखमेचे प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींना अटक करुन अटकेचे पंचनामे तयार केले. तपासाअंती आरोपींविरुध्द उपरोक्त कलमान्वये अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, परभणी येथे दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपी अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, परभणी यांचेसमक्ष हजर झाले. भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३५३ हा गुन्हा सत्र न्यायालय यांचेपुढे चालणारा असल्यामुळे सदर प्रकरण सत्र न्यायालयास वर्ग केले.

०५. आरोपी हे या न्यायालयात हजर झाले. मी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३३२, ३४१, ३४२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम ३४ कलमान्वये दोषारोप निश्चीत केला. आरोपींनी दोषारोप नाकारुन प्रकरणाची सुनावणीची मागणी केली.

०६. अभियोगपक्षाने त्याच्या कथनाच्या पृष्ठयर्थ एकूण तीन साक्षीदार तपासले व नि.१ वरील आदेशानुसार अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०७. अभिलेखावरील आरोपींविरुध्द आलेल्या पुराव्याचे अवलोकन करुन आरोपीचे फौ.प्र.संहीता कलम ३१३ नुसार जबाब नोंदवण्यात आले. आरोपींनी त्यांच्याविरुध्द आलेला पुरावा नाकारला आणि त्यांच्याविरुध्द ही खोटी केस केल्याचे म्हटले आहे.

०८. मी सरकारपक्षातर्फे अति.सरकारी अभियोक्ता श्री.व्ही.एच.चेनलवाड यांचा व आरोपींतर्फे श्री. एम.के.तोष्णीवाल वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. त्यावरुन खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की आरोपींनी आपसात संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदार लोकसेवक या पदावर कार्यरत असताना त्यांना मारहाण केली व फौजदारीपात्र बलप्रयोग करुन त्यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण केला व अशाप्रकारे भा.दं.वि.कलम ३५३ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | > | नकारार्थी. |
| २ | अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द इतर कोणता गुन्हा सिध्द केला आहे काय ? | > | नकारार्थी. |
| ३ | आदेश काय ? | > | आरोपींना खालील आदेशाप्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

**मुद्या क्र.१ व २ करीता -**

०९. मुद्दे क्र. १ व २ एकमेकांशी निगडीत आहेत म्हणून पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे विचारात घेतले आहेत.

१०. अति.सरकारी अभियोक्ता श्री. व्ही.एच.चेनलवाड यांनी सखोल युक्तीवाद न करता सदर प्रकरणाचा निकाल गुणदोषावर द्यावा असा युक्तीवाद केला. आरोपींचे वकील

श्री. एम.के.तोष्णीवाल यांनी युक्तीवाद केला की, साक्षीदारांनी सरकारपक्षाच्या कथनास पुष्टी दिलेली नाही म्हणून आरोपींविरुध्दचा गुन्हा निःसंशय सिध्द झालेला नाही करीता आरोपींना निर्दोष मुक्त करावे.

११. फिर्यादी सा.क्र.३ उपेंद्र विश्वनाथ धकाते यांच्या साक्षीत असे आले आहे की, सन २०१६ मध्ये ते अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण शहर उपविभाग परभणी येथे नोकरीस होते. दिनांक २७.०३.२०१६ रोजी महावितरणतर्फे विद्युत बिल थकबाकी वसूल करण्याकरीता विशेष मोहिम राबबविण्यात आली होती. त्यादिवशी विद्युत बील वसुलीकरीता ते व महावितरणचे कर्मचारी परभणी शहरामध्ये आंध्रा बँकेच्यासमोर बांटीया यांच्या नावे असलेल्या विद्युत मीटरचे विद्युत बिल थकीत असल्यामुळे तीथे गेले होते. त्यांनी बांटीया यास थकीत विद्युत बील भरण्याकरीता सांगितले. त्याने विद्युत बील भरण्यास नकार दिला. त्यांनी त्यांच्या कर्मचा-यांना त्याची विद्युत जोडणी खंडीत करण्याकरीता सांगितले. त्यांच्या कर्मचा-याने विद्युत जोडणी खंडीत केली. त्यानंतर बांटीया व त्यांच्यामध्ये थोडा वाद झाला. ते वाहनामध्ये बसून निघून जाणार होते. परंतु बांटीयाने त्यांना आडवले व विद्युत पुरवठा पूर्ववत करण्यास सांगितले. त्याने त्यांना वाहनातून खाली उतरण्यास सांगितले व त्याच्या घरी बोलावून त्यांना तेथे थांबवून ठेवले. सहा.अभियंता श्री भडंगे यांनी कंट्रोल रुमला फोन केला. त्यानंतर पोलीस तेथे आले व त्यांनी त्यांना सोडवले. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाणे येथे रिपोर्ट नि.६५ दिला. सदर प्रकरणाला बरीच वर्षे झाल्यामुळे तो बांटीया व त्याच्यासोबतच्यांना ओळखू शकत नाही असे कथन केले. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासणीत सांगितले की, विद्युत जोडणी असलेले घर कोणाच्या मालकीचे आहे हे त्याला सांगता येत नाही, बांटीया यांच्या घराची विद्युत जोडणी तोडण्यापूर्वी पूर्व सूचनापत्र पाठवले होते किंवा नाही हे त्याला आठवत नाही.

१२. सा.क्र. १ संतोष गायकवाड याने त्याच्या साक्षीत असे कथन केले की, पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी बोलावले होते किंवा नाही याबाबत त्याला आठवत नाही. पोलीसांनी त्याच्यासमक्ष पंचनामा केला नाही. पोलीसांनी त्याची व सुरेश कदम याची सही घेतली होती. पोलीसांनी पंचनामा त्यांना वाचून दाखवला नाही. सरकारी वकीलाच्या तोंडी विनंतीवरुन सदर साक्षीदाराला सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली परंतु सदर

साक्षीदाराने सरकारी वकीलाच्या इतर सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. करीता घटनास्थळ पंचनामा सिध्द झाला नाही.

१३. सा.क्र. २ दिपक खंदारे हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. त्याने त्याच्या साक्षीत सांगितले की, पोलीसांनी त्याला बोलावले होते व त्यांनी त्याची सही घेतली होती. त्याच्यासमक्ष आरोपी आणि फिर्यादीमध्ये काही घडले नाही. पोलीसांनी त्याचा जबाब नोंदवला नव्हता. सरकारी वकीलाच्या तोंडी विनंतीवरुन सदर साक्षीदाराला सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली परंतु सदर साक्षीदाराने सरकारी वकीलाच्या इतर सूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली. करीता त्याच्यासमक्ष सदर घटना घडल्याचे सिध्द झाले नाही.

१४. अभिलेखाचे व साक्षीदारांच्या साक्षीचे अवलोकन केले. फिर्यादी सा.क्र. ३ उपेंद्र धकाते यांनी त्यांच्या साक्षीत ते आरोपी बांटीया यांना व त्याच्या सोबतच्यांना ओळखू शकत नाही कारण या प्रकरणाला बरीच वर्षे झाली आहेत असे कथन केले. सदर खटल्यात एकूण चार आरोपी आहेत परंतु कोणत्या आरोपीने कोणाला धक्का-बुक्की केली व त्यांना डांबून ठेवून त्यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण केला हे स्पष्ट कथन केले नाही. विद्युत जोडणी असलेले घर कोणाच्या मालकीचे होते हे त्यांना सांगता येणार नाही तसेच विद्युत जोडणी तोडण्यापूर्वी आरोपीला पूर्वसूचना दिली होती किंवा नाही हे सुध्दा आठवत नाही असे कथन केले. सदर साक्षीदारांव्यतिरिक्त स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष सदर खटल्यात अभियोग पक्षातर्फे नोदंवण्यात आली नाही. साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनास पुष्ठी दिली नाही. करीता आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार लोकसेवक या पदावर कार्यरत असताना त्यांना मारहाण केली व फौजदारीपात्र बलप्रयोग करुन त्यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण केला असल्याचे निःसंशय सिध्द होत नाही. करीता आरोपींवरील दोषारोप अभियोगपक्षाने सिध्द केला नाही. घटनास्थळ पंचनामा नि.७० जरी आरोपींनी मान्य केले असले तरी केवळ सदर घटनास्थळ पंचनाम्यावरुन आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होत नाही. एकंदरीत साक्षीदारांचा पुरावा व कारणमिमांसा लक्षात घेता साक्षीदारांनी अभियोगपक्षाच्या कथनास पुष्ठी दिली नसल्यामुळे आरोपींवरील दोषारोप निःसंशस सिध्द होत नाही. करीता आरोपी या प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत म्हणून मी मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी

नोंदवून खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपी क्र.१. गेंदमल भिकुलाल बांठीया, क्र. २ सुरेंद्र गेंदमल बांठीया, क्र. ३ विनय गेंदमल बांठीया व क्र. ४ संतोष शिवप्रसाद साखी यांना भारतीय दंड विधान कलम ३३२, ३४१, ३४२, ३५३, ३६५, ५०४ सह कलम ३४ या आरोपातून बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम २५८(१) नुसार (फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २३५(१)) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २ | आरोपींचे जामीन बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ४ | आरोपींनी बी.एन.एस.एस. २०२३ चे कलम ४८१ ( फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ) च्या पुर्ततेकरीता प्रत्येकी रु.१०,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र व त्याच रकमेचा जामीन द्यावा. |
| ५ | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला. |

GAUTAM GANPATRAO BHARNE
Digitally signed by GAUTAM GANPATRAO BHARNE
Date: 2026.07.30 17:43:33 +0530

दिनांक – ३० जुलै, २०२६.

( गौतम ग. भरणे )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, परभणी.